REGISTERED No. B 3434.




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १३ पुणें, बुधवार तारीख १ आक्टोबर १९४७ अंक ४०

हे प्रॉस्पेक्टस नसून फक्त प्रसिद्धीपत्रक आहे.
( प्रॉस्पेक्टसची मूळ इंग्रजी प्रत मे. रजिस्ट्रार ऑफ कंपनीज मुंबई यांजकडे फाइल केली आहे )

## पूना केमिकल्स अॅण्ड फर्टिलायझर्स लिमिटेड.

रजि. ऑफिस ९४/९५ नारायण पेठ, लक्ष्मीरोड. पुणें नं २.

या कंपनीचे शेअर्स विकावू आहेत व शेअर विक्री रोज चालू आहे.

**अधिकृत भांडवल रु. तीन लाख ३,००,०००**
**विक्रीस काढलेले भांडवल रु. तीन लाख ३,००,०००**

१००० ५% क्यु. प्रे. शेअर्स प्रत्येकीं रु. १०० चा, व

४००० ऑर्डिनरी शेअर्स प्रत्येकीं रु. ५० चा याप्रमाणें विभागले आहे. अर्जासोबत निम्मी रक्कम व अर्ज **मंजूरी नंतर राहिलेली सर्व रक्कम ३ महिन्यांनीं कंपनी मागणी करील त्यावेळीं.**

कच्च्या मालाचा विपूल पुरवठा, तज्ज्ञाची देखरेख, कारखान्यांत तयार होणारी खतें, पेंड, तेलें, साबण इत्यादि उपयुक्त मालाला बाजारपेठा नजिक असलेनें कंपनीचे चालकांना पहिलेच वर्षापासून शेअर होल्डर्सना ६% चे वर डिव्हिडंड देतां येईल अशी खात्री आहे. कंपनी पुढील महिन्यांतच कारखान्याचे कामास सुरवात करणार आहे. कंपनीनें तूर्त या वर्षी सातार्‍यानजिक चालू तेलाचा कारखाना चालविण्यास घेतला असून येथे दिपवाळीपासूनच पेंड व तेलें, साबण व इतर खतें यांचा पुरवठा सुरू करील. कंपनीचे शेतकरी शेअर होल्डर्सना शेअरचे प्रमाणांत दळलेली बोन मील मिश्र पेंड येते दिपवाळीपासूनच देण्यास सुरवात होईल. तरी शेतकरी, बागायीतदार यांनी जास्तीत जास्त शेअर्स खरेदी करून आपले पेंडीची मागणी नोंदविण्यास सुरवात करावी.

वरील कोणताही एक शेअर घेणार्‍या शेतकरी शेअर होल्डर यांस या वर्षी योग्य कंट्रोल भावांत ३ पोती दळलेली बोन मील मिश्र पेंड, २ पोती बोन मील देता येईल. ही सवलत फक्त ता. १६–१०–४७ अखेर शेअर्स घेणार्‍यालाच राहील.

महाराष्ट्रांत आमचे शेअर विक्री करणेस वजनदार एजंटस् नेमणें आहेत. एजंट होऊं इच्छिणार्‍यांनीं आमची केसरीमधील दि. ५–९–४७ ची जाहीरात वाचून पत्रव्यवहार करावा.

शेअर फॉर्म, माहितीपत्रकें मागविण्याचा पत्ता—

**मे. लोणकर अॅण्ड को.** मॅनेजिंग एजन्टस,
पूना केमिकल्स अॅन्ड फर्टिलायझर्स लिमिटेड, २८९ अ, नारायण पेठ, पुणें नं. २

## विविध माहिती

**अमेरिकेकडून अन्नधान्याची आयात**-अमेरिकेकडून परदेशांना मिळणाऱ्या अन्नधान्यापैकी नोव्हेंबरमध्यें हिंदुस्थानला ६३,००० टनांचा वाटा मिळाला आहे. नोव्हेंबरमधील एकंदर निर्यातीचें धान्य ७,८८,८०० टन आहे व ह्यापैकी ६७ टक्के धान्य अमेरिकन सरकार खुल्या बाजारांतूनच विकत घेणार आहे.

**हिंदुस्थानांत इराकचें व्यापारी शिष्टमंडळ**—पाकिस्तान व हिंदुस्थान ह्या वसाहतींशीं व्यापाराच्या वाटाघाटी करण्यासाठी इराकच्या सरकारचें व्यापारी शिष्टमंडळ ऑक्टोबर महिन्यांत हिंदुस्थानांत येणार आहे.

**बंगालला मदत**—ब्रह्मदेशांतून पूर्व बंगालला २,५०० टन तांदूळ लवकरच पाठविण्यांत येणार आहे असें समजतें. ह्याशिवाय, पश्चिम पाकिस्तानकडून ५ हजार टन तांदूळ आणि २,००० टन गहूं मिळेल अशी अपेक्षा आहे. पूर्व बंगालमध्यें नुकत्याच होऊन गेलेल्या पुरामुळें तेथील अन्नधान्याची टंचाई दुणावली आहे.

**अमेरिकन काँग्रेसचें खास अधिवेशन**—युरोपांतील मार्शल योजनेंत सामील झालेल्या १६ राष्ट्रांना मदत करण्याच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी आणि त्याप्रमाणें मदत होईपर्यंत तात्पुरतें साह्य देण्यासाठीं अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मि. मार्शल हे प्रे. ट्रुमन ह्यांना अमेरिकन काँग्रेसचें खास अधिवेशन बोलावण्याचा सल्ला देत आहेत असें समजतें.

**तांदुळाची नवी जात**—सोव्हिएट रशिआंतील शेती संशोधन केंद्रांत समशीतोष्ण कटिबंधांत उगवूं शकणाऱ्या भाताचें बियाणें तयार करण्यांत येत आहे. हें बियाणें लावलें तर आज मध्य आशियांतच फक्त होऊं शकणारा तांदूळ युक्रेनमध्येंही होऊं शकेल. सोव्हिएट रशिआच्या युद्धोत्तर पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस रशिआंतील तांदुळाची लागवड ७,५०,००० एकरांपर्यंत पोंचेल.

**अमेरिकन निर्यातीला ब्रम्हदेश बंद**—अमेरिकेंतून माल आणण्यासाठी दिलेले परवाने तात्पुरते स्थगित करण्याचा हुकूम ब्रंह्मदेशाच्या सरकारनें काढला आहे. डॉलर्सची बचत करण्यासाठी हा हुकूम काढण्यांत आला आहे.

### तीन बँकांबाबत 'मोरॅटोरियम'

न्यु बँक ऑफ इंडिया लि., ट्रेडर्स बँक लि. व लक्ष्मी कमार्शिअल बँक लि. ह्या बँकांचे संबंधांत हिंदुस्थान सरकारने एक हुकूम काढून त्यांनीं आपलीं देणीं देणें स्थगित करण्यास कायदेशीर मान्यता दिली आहे.

### प्रि. गाडगीळ पुणें सें. को. बँकेचे चेअरमन

पुणें सें. को. बँकेच्या डायरेक्टरांपैकी एकाची नेमणूक जिल्ह्याच्या कलेक्टरांनीं करावयाची असते. १९४७–४८ सालाकरितां त्याप्रमाणें प्रि. गाडगीळांची नेमणूक करून जिल्हाधिकाऱ्यांनीं उत्कृष्ट प्रथा पाडली, ह्याबद्दल त्यांचें अभिनंदन केलें पाहिजे. प्रि. धनंजयरावांनीं ही नेमणूक पत्करली आणि जिल्हा बँकेस आपल्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा देण्यास ते तत्पर झाले हें उत्तम झालें. बँकेच्या भागीदारांनीं त्यांना चेअरमन निवडलें असून श्री. य. द. खोले हे व्हाइसचेअरमन झाले आहेत.

### भेट

ता. २८ रोजीं नामदार एम्. पी. पाटील, शेतकी मंत्री, यांनीं गोवर्धन डेअरी फार्मवर भेट दिली, व तेथील कार्य पद्धती व लाइव्ह स्टॉक पाहून समाधान व्यक्त केलें, व नवीन आणलेल्या ट्रॅक्टरचें उद्घाटन नामदार यांनीं केलें.

### बँकिंग कंपनीज (ईस्ट पंजाब व दिल्ली) आर्डिनन्स, १९४७

वरील ऑर्डिनन्स हिंदुस्था सरकारनें काढला आहे, त्याचा उद्देश पूर्व पंजाब व दिल्ली येथें ज्यांची मुख्य कचेरी आहे, अशा बँकांचें व त्यांच्या ठेवीदारांचें हितसंरक्षण करणें हा आहे. तेथील लहान व मध्यम आकाराच्या बँकांचे पैसे पश्चिम पंजाबांत अडकले आहेत, परंतु त्यांच्या ठेवींच्या परतफेडीची जबाबदारी मात्र हिंदुस्थानांतील शाखांकडे आलेली आहे. पश्चिम पंजाबांतील कागदपत्रें किंवा जिंदगी हीं हातीं येण्याची अडचण असल्यामुळें ठेवी देणें बँकांना अवघड जात आहे. ऑर्डिनन्सप्रमाणें, ठेवीदारांना त्यांच्या ठेवीच्या १०% किंवा २५० रु. इतपर्यंतच पैसे काढून घेतां येतील. ह्यापलीकडे ठेवी देण्यास व व्यवस्थेच्या चालू खर्चापेक्षा ज्यास्त खर्च करण्यास बँकांना परवानगी नाहीं. त्याप्रमाणें नवीन ठेवीहि त्या घेऊं शकणार नाहींत. वरील प्रकारें ठेवीदारांना रकमा देण्यासाठी बँकांना पैसे कर्जाऊ देण्याचा मध्यवर्ती सरकारास ऑर्डिनन्सनें अधिकार दिला आहे.

## टेक्स्टाइल कमिशनरांचा कारखानदारांना इषारा

### सूत दुसऱ्यास देण्यास मनाई

मुंबई प्रांतांत सरकार निरनिराळ्या ग्राहकांना जें सूत पुरवितें तें त्यांच्या स्वतःच्या कारखान्यांत उपयोगांत आणण्यासाठी असतें. कोणाहि ग्राहकास आपल्याला मिळालेलें सूत दुसऱ्या ग्राहकास देण्याचा मुळींच अधिकार नाहीं.

कांहीं कांहीं कारखानदारांनीं आपल्याला मिळालेलें सूत स्वतःच्या कारखान्यांसाठी न वापरतां दुसऱ्या कारखानदारांना अनधिकृतपणें पुरविल्याचीं कांहीं उदाहरणें प्रॉव्हिन्शिअल टेक्स्टाईल कमिशनरांच्या दृष्टोत्पत्तीस आलीं आहेत. असें करणें म्हणजे मिळणाऱ्या सुताचा दुरुपयोग करण्यासारखें आहे व तसें करण्यास कायद्यानें मनाई आहे.

तेव्हां यापुढें कोणी ग्राहक सुताचा असा व्यवहार करतांना आढळून आल्यास त्याचा पुरवठा ताबडतोब बंद करण्यांत येईल, असा प्रॉव्हिन्शिअल टेक्स्टाईल कमिशनरनीं सर्व ग्राहकांना इषारा दिला आहे.


## जाहीर खुलासा

'सकाळ'च्या सोमवार ता. २२-९-४७ च्या अंकांत पहिल्या पानावर उजव्या हाताच्या कॉलममध्यें 'बेळगांव बँकेंत अफरातफर' या मथळ्याखालीं व बँकेस सील केल्याबद्दल जो मजकूर प्रसिद्ध झाला आहे तो मजकूर बेळगांव येथील दि बँक ऑफ सिटिझन्स लि., बेळगांव यासंबंधी असून, त्याचा 'दि बेळगांव बँक लि., बेळगांव' यासी कांहींही संबंध नाहीं. दि बेळगांव बँक लि., बेळगांव यामध्यें कोणत्याही प्रकारची अफरातफर झाली नसून, त्या बँकेचा व्यवहार अगदीं सुरळीत, नेहमीप्रमाणें चालूं आहे.

वरील सकाळच्या अंकांत व इतर कांहीं वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालेल्या मजकुरावरून लोकांचा गैरसमज होणेचा संभव असलेनें बँकेच्या हिताचे दृष्टीनें सदरील जाहीर खुलासा करणें इष्ट झालें आहे.

दि बेळगांव बँक लि., करितां
बेळगांव — एम्. जी. हेरेकर,
ता. २२-९-४७. — चेअरमन

# अर्थ

बुधवार, ता. १ ऑक्टोबर, १९४७


संस्थापक
प्रो. वा. गो. काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## कोठारांच्या पावत्यांचे तारणावरील कर्जाची व्यवस्था

शेतीच्या उत्पादनाची साठवण करणारीं कोठारें स्थापन व्हावीं आणि त्यांचेवर देखरेख व नियंत्रण ठेवण्याची व्यवस्था व्हावी ह्या दृष्टीनें मुंबई सरकारनें एक बिल तयार केलें आहे. लायसनदार कोठारांत ठेवलेल्या मालाबद्दल कोठाऱ्यानें पावती द्यावी, आणि ह्या पावतीचे तारणावर शेतकऱ्यास मोसमापुरतीं कर्जे मिळावींत अशी योजना आहे. रिझर्व्ह बँकेच्या सूचनांस अनुसरूनच वरील बिलाची आखणी केलेली आहे.

शेतकरी वर्ग संघटित नसल्याकारणानें आणि त्याचा माल साठविण्याची सोय नसल्यामुळें त्याला बाजारांत तात्काळ माल विकावा लागून पैसा उभा करावा लागतो. विक्रेता व खरेदीदार ह्यांचेमध्यें वांधा निर्माण झाल्यास किंवा मालास योग्य किंमत मिळत नसल्यास शेतकऱ्यास आपल्या मालाची विक्री कांहीं काळ तहकूब करता आली नाहीं तर त्याचें अत्यंत नुकसान होतें. कित्येक प्रसंगीं, शेतकऱ्यांस मिळेल त्या भावानें माल विकून आपली नड भागवावी लागते. योग्य नियंत्रणाखालील कोठारें अस्तित्वांत आलीं तर शेतकऱ्यास आपला माल कांहीं काळ सुरक्षित साठवून ठेवता येईल, इतकेंच नव्हे तर बँकेकडून त्यास मालाचे तारणावर कर्जहि मिळूं शकेल. पोर्ट ट्रस्टनें दिलेली मालाची पावती तारण म्हणून स्वीकारून बँका कर्जे देतात आणि रेल्वे रिसीट्सहि कांहीं प्रमाणांत तारणाप्रमाणें उपयोगी पडतात. कोठारांतील मालाची पावती अशाच रीतीनें तारण म्हणून घेतली जाऊन, शेतकऱ्यास अल्प व्याजाच्या दरानें सहकारी बँकांमार्फत कर्ज मिळूं शकेल.

वरील प्रकारची कोठारें स्थापन करण्यांत यावी, अशी सूचना १९३० सालीं मुंबई प्रां. बँकिंग इनक्वायरी कमिटीनें केली होती आणि मध्यवर्ती कमिटीनेंहि त्याचप्रमाणें शिफारस केली होती. ती अंमलांत येण्यासाठी योग्य अशा कोठारांची व्यवस्था होणें अगत्याचें होतें, आणि त्याकरितां आतां सरकारी बिल मांडलें जात आहे. (१) कोठारांची व्यवस्था चोख रहाण्यावर, (२) कोठारांवर बाहेरून कडक देखरेख ठेवली जाण्यावर आणि (३) आपल्या कामाबद्दल कोठारांनीं योग्य पैशाची आकारणी करण्यावर, ह्या योजनेचें यश अवलंबून आहे, असें प्रांतिक कमिटीनें नमूद करून ठेवलें आहे. त्या इषाऱ्याचें महत्त्व आजहि कायम आहे.

मुंबई सरकारच्या नियोजित कायद्याचें नांव "बाँबे वेअर हाउसेस ॲक्ट, १९४७" असें आहे आणि तो सर्व प्रांतास लागू होणार आहे. कोठार चालविण्याचा धंदा करण्याचा ज्यास लायसेन्स दिला जाईल, त्यासच हा धंदा करता येईल. ज्या मालाच्या साठवणीसाठीं लायसेन्स हवा असेल त्यासाठी कोठार सोइस्कर आहे किंवा नाहीं, कोठार चालविण्यास कोठारी लायक आहे काय, आवश्यक ती जामीनकीची रकम अर्जदारानें भरली आहे काय, इतर कांहीं अटी अर्जदारानें पुऱ्या केल्या आहेत काय, वगैरेबाबत चौकशी करूनच कोठाऱ्यास लायसेन्स दिला जाईल. कोठाऱ्याचें दिवाळें निघालें, त्याचा कोठारावरील ताबा कमी झाला, कोठार चालविण्याचें त्यानें बंद केलें, आपल्या कामाबद्दल भरमसाट पैसे घेऊं लागला, काम करण्यास कोणत्याहि कारणामुळें नालायक झाला किंवा लायसेन्सच्या अटी मोडल्या तर कोठाऱ्याचा लायसेन्स रद्द केला जाईल.

प्रत्येक लायसनदार कोठाऱ्यानें आपल्या ताब्यांतील मालाची योग्य ती काळजी आणि मालाचा नाश होणार नाहीं ह्या विषयीं खबरदारी घेतली पाहिजे. कोठारांतील इतर मालास इजा होईल अशा प्रकारचा माल साठवणीसाठी त्यानें पत्करता कामा नये. वेगवेगळया मालकांचा माल एकमेकांपासून दूर व अलग ठेवला पाहिजे. माल खराब होऊं लागला, तर मालकास त्याची खबर देऊन माल उठविण्यास सांगितले पाहिजे. परंतु मालकानें तसें केलें नाहीं तर मालाची जाहीर लिलांवानें विक्री करून टाकण्याचा अधिकार कोठाऱ्यास आहे. कोठारांत माल ठेवणारास, पावती परत करून व कोठाराची बाकी देऊन, केव्हांही माल मागण्याचा अधिकार आहे. कोठारांतील मालाचा आग, पूर, चोरी, इत्यादि अपघातांचा विमा उतरविला जाणें कायद्यानें आवश्यक ठरविलें आहे. त्याचा योग्य तो आकार माल ठेवणाराकडून वसूल करण्याचा कोठाऱ्यास अधिकार आहे. कोठाऱ्यानें सर्व गिऱ्हाइकांस समानतेनें वागविलें पाहिजे; सहकारी सोसायटीस मात्र ठराविक सवलती देण्यास हरकत नाहीं. स्वतःच्या कोठारांतील मालाचे तारणावर कोठाऱ्यानें स्वतःच कर्ज देण्यास कायद्यानें प्रतिबंध केला आहे. परंतु ही बंदी सहकारी सोसायटयांचें कोठार असल्यास त्यास लागू नाहीं.

कोठारांत ठेवलेल्या मालाचा संपूर्ण तपशील देणारी पावती कोठाऱ्यानें दिली पाहिजे. ह्या पावतींत दाखल असलेल्या मालाची मालकी त्यावर सही करून, चेकप्रमाणें, वर्ग होऊं शकेल आणि पावती धारण करणारास मूळ माल ठेवणाराचे सर्व हक्क प्राप्त होतील. लायसेन्सच्या अटी कोठाऱ्यानें मोडल्या किंवा बाँबे वेअर हाऊस कायद्याचा भंग केला, तर त्यानें जामीनकीची भरलेली रकम जप्त केली जाईल आणि कराराप्रमाणें वसूल व्हावयाची रकम त्याचेकडून जातीनें, त्याच्या वारसांकडून किंवा कायदेशीर प्रतिनिधीकडून जमीन महसुलाच्या बाकीप्रमाणें वसूल केली जाईल. अशा जप्तींतून व वसुलींतून, ज्यांचें नुकसान झालें असेल त्याची सरकार भरपाई करील. लायसेन्सविना जो कोठारांत माल साठवून त्याच्या पावत्या देण्याचा कोठाऱ्याचा धंदा चालवील किंवा जो लायसनदार कोठारी स्वतःच कोठारांतील मालाचे तारणावर कर्जे देईल, त्यास गुन्हा शाबीत झाल्यास कमाल ६ महिने कारागृहवासाची व १,००० रु. दंडाची शिक्षा सांगितली आहे. कायद्याचीं इतर कलमें मोडणारास कमाल १,००० रु. दंड होईल. कायद्याच्या अंमलबजावणीसाठी तपशीलवार नियम करण्याचा प्रांतिक सरकारास अधिकार आहे.

मुंबई सरकारनें वरील प्रकारची योजना करून शेतकऱ्यांच्या हित संवर्धनाचे बाबत आघाडी मारली आहे. व्यावहारिक अडचणी जसजशा येत जातील त्या प्रमाणें त्या दूर करतां येतील.

## रिझर्व्ह बँक आणि शेतकी–विषयक कर्जें

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिआ बुलेटिनच्या ऑगस्टच्या अंकांत, शेतीविषयक पतीच्या व्यवहारांत रिझर्व्ह बँकेचें कार्य व स्थान काय आहे, ह्या विषयासंबंधीं एक लेख प्रसिद्ध झाला आहे. हा लेख बँकेच्या ॲग्रिकल्चरल क्रेडिट खात्याचे मुख्य अधिकारी, श्री. के. सुब्बराव ह्यांनी लिहिलेला असून त्यांत त्यांनी रिझर्व्ह बँकेवर करण्यांत येणाऱ्या टीकेला उत्तर दिलें आहे. रिझर्व्ह बँकेच्या कार्यांत शेती–विषयक अर्थ व्यवहारासाठी अल्प व्याजाच्या दरानें कर्जें देण्याचें एक कार्य आहे. हें कार्य बँकेनें सहकारी बँकांच्या मध्यस्थीनें करावयाचें होतें. श्री. सुब्बरावं ह्यांचे म्हणणें असें कीं १९३८ सालीं रिझर्व्ह बँकेनें एक सर्क्युलर काढून सहकारी बँकांना कशा पद्धतीनें मदत करण्यास रिझर्व्ह बँक तयार आहे हे कळविलें होतें. शेतकी विषयक पतीच्या व्यवहारांसाठीं जी मदत रिझर्व्ह बँक करणार होती ती करण्यापूर्वीं सहकारी बँकांचे व्यवहार बँकिंगच्या धंद्यांच्या तत्त्वाप्रमाणें चालत आहेत कीं नाहींत हें पहाण्याचा वरील सर्क्युलर काढण्याचा हेतू होता. परंतु सहकारी बँकांनीं ह्या सर्क्युलराप्रमाणें रिझर्व्ह बँकेच्या तपासाला संमति दिली नाहीं. अर्थात् रिझर्व्ह बँकेला अधिक कांहीं करतां येणें शक्य नव्हतें. कारण, सहकारी बँकांच्या कारभारांत सुधारणा घडवून आणण्याचा अधिकार प्रांतिक सरकारांना आहे; रिझर्व्ह बँकेला नाहीं. शेतीच्या हंगामांत पतीवर कर्जें देणें किंवा शेतीच्या मालाला बाजारपेठ मिळवून देणें ह्यासाठीं, रिझर्व्ह बँकेच्या कायद्याप्रमाणें कोठारांत माल ठेवून त्याच्या बदला दिलेल्या पावत्यांची आवश्यकता आहे. पण शेतीचा माल सांठविण्याची कोठारेंच जर नाहींत तर ह्या पावत्या तरी येणार कोठून ! रिझर्व्ह बँकेची स्थापना होऊन १३ वर्षें होऊन गेलीं तरी अजून अशा कोठारांची सोय करण्यांत आलेली नाहीं. ही कोठारें बांधण्याचें काम प्रांतिक सरकारांचें आहे.

शेतीच्या व्यवसायांत गुंतलेल्या लोकांना आर्थिक मदत करण्याच्या कार्यांत रिझर्व्ह बँकेवर कायद्यानेंच कांहीं बंधनें घातलीं असून तीं पाळणें बँकेला भागच आहे. एकतर रिझर्व्ह बँकेला शेतकऱ्याला प्रत्यक्ष मदत करता येत नाहीं. ती करण्यासाठीं शेड्यूल्ड बँका अगर सहकारी बँका ह्यांच्या मार्फतच बँकेला व्यवहार करावा लागतो. दुसरें असें कीं शेतीला लागणारें दीर्घ मुदतीचें आर्थिक साह्य देण्याचा बँकेला अधिकारच नाहीं. फक्त शेतीच्या हंगामाच्या वेळीं जरूर असणारीं अगर मालें बाजारांत नेण्यासाठीं जरूर असणारीं अल्प मुदतीचीं कर्जेंच बँकेला देतां येतात. अशा कर्जांची मुदत जास्तींत जास्त ९ महिन्यांपेक्षा अधिक असूं शकत नाहीं. शेतीच्या मालाची बाजारपेठेंत पाठवणी करण्यासाठीं शेड्यूल्ड बँकांच्या मार्फत प्रयत्न करण्यांत आले. त्यासाठी खेडोपाडीं पसरलेल्या सावकारांचा उपयोग शेड्यूल्ड बँका करतील अशी रिझर्व्ह बँकेची अपेक्षा होती. परंतु शेड्यूल्ड बँकांना सावकारांच्या मार्फत शेतकऱ्याला कर्जें पोंचविणें अव्यवहार्य वाटलें; त्यामुळें रिझर्व्ह बँकेची ही योजना फलद्रूप झाली नाहीं. सहकारी चळवळीची व्याप्ती वाढावी तितकी वाढली नसल्यानें १९३८ सालीं रिझर्व्ह बँकेनें वरील प्रयत्न केला होता.

कर्जांची मुदत ९ महिने म्हणजे फार कमी होती अशी टीका करण्यांत आलेली आहे. तथापि रिझर्व्ह बँकेचा कायदा तयार करणाऱ्यांना तेवढी मुदत पुरेशी वाटली असावी. ही मुदत १२ महिन्यांची करतां येईल कीं नाहीं, ह्या विषयीं विचार चालू असल्याचें समजतें. मुंबई सरकारचें कोठारे बांधण्याविषयीं व त्यांत माल ठेवून पावत्या देण्याविषयीं बिल नुकतेंच प्रसिद्ध झालेलें आहे. त्याचा विचार आजच्या अमलेसांत केलेलाच आहे.

## हक्कपूर्तीच्या दिरंगाईचे परिणाम

### विमा कंपन्यांवर हायकोर्टाचे ताशेरे

विमा कंपन्या कधीं कधीं हक्कपूर्तीच्या कामाला दिरंगाई करतात आणि त्यामुळें गरीब हक्कदाराचें नुकसान होतें. अशा प्रकारचा एक दावा नुकताच मुंबई हायकोर्टांत आला होता. त्याची हकीगत अशी. हिरूबाई नांवाच्या एका बाईचा नऊ वर्षांचा नातू एका मोटार लॉरीखालीं सांपडून मरण पावला. बाईनें मोटार मालक मि. करमाल सिंग ह्यांच्यावर फेटल अक्सिडंट ॲक्टाप्रमाणें फिर्याद केली व नुकसान भरपाईची मागणी केली. मोटार ड्रायव्हरला बेफामपणें गाडी हांकल्याबद्दल शिक्षा झालेली होतीच. मि. करमाल सिंग ह्यांनी ज्या कंपनींत आपली गाडी 'थर्ड पार्टी रिस्क' साठीं इन्शुअर केलेली होती, त्या कंपनींत हिरूबाईला नेलें. परंतु हक्कासंबंधींचे कागदपत्र भरून आल्याशिवाय कांहीं करतां येणार नाहीं असें कंपनीच्या मॅनेजरनें सांगितलें. मोटारीचा ट्रॉपिकल इन्शुरन्स कंपनीकडे विमा उतरलेला होता. मि. करमाल सिंग ह्यांनीं कायद्याप्रमाणें एक वर्षाच्या आंत कागद भरून पाठविले नाहींत. अर्थातच हक्क मुदतीच्या बाहेर गेला. ह्या खटल्यांत कोर्टानें फिर्यादीला प्रतिवादी विरुद्ध ३ हजारांचा हुकूमनामा दिलेला आहे. तथापि फिर्यादीला कांहींच न मिळण्याची शक्यता आहे असें निकालपत्रांत म्हटलें आहे. अशा प्रकारच्या हक्कपूर्तीच्या प्रकरणांत लक्ष घालण्यासाठीं सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुरन्सनें एखादा अधिकारी नेमावा म्हणजे निरुपयोगी ठरणारे दावे चालविण्याची गरीब जनतेवर पाळी येणार नाहीं अशी शिफारस निकाल पत्रांत केलेली आहे.

मोटारीचा थर्ड पार्टी विमा आतां सक्तीचा झाला असून, मोटारवाले त्याच्या पोटीं विमा कंपन्यांना दरसाल मोठाल्या रकमा भरीत असतात. त्यांचा उद्देश, पादचारी लोकांना संरक्षण मिळावें हा असतो. गरीब लोकांनीं नुकसान भरपाईची मागणी केली व मोटारवाल्यांनीं विमा उतरलेला असला तरी कालहरण होऊन प्रत्यक्ष दावा लावण्यास उशीर होतो आणि क्लेम मुदतीच्या बाहेर जातो. अशा परिस्थितींत विमा कंपन्यांनीं आपली जबाबदारी टाळण्याचा प्रत्यन करणें अश्लाघ्य असल्याचें न्यायमूर्तींनीं सांगितलें.

---

## अमेरिकेंतील किंमती आणि ब्रिटनचें कर्ज

अमेरिकेनें इंग्लंडला दिलेलें कर्ज १९५० अखेर पुरेल असा अंदाज होता. पण अमेरिकेंतील वाढत्या किंमतीमुळें तें तात्काळ संपण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं व त्यामुळें इंग्लंडवर आर्थिक संकट गुदरलें. इंग्लंडमधील रबराच्या एका कंपनीच्या अध्यक्षांनीं ह्यासंबंधींचा उल्लेख आपल्या कंपनीच्या वार्षिक सभेंत केला आहे. अमेरिकेला रबर पुरवून इंग्लंडला डॉलर्स मिळवितां येण्याची शक्यता सांगितल्यावर, कंपनीचे अध्यक्ष म्हणतात कीं १९३९ सालच्या परिस्थितींत व आजच्या परिस्थितींत महदंतर पडल्याचें आपणास दिसून येतें. १९३९ सालीं १ पौंड रबराच्या मोबदला अमेरिकेकडून १॥ पौंड कापूस मिळत असे, तो आतां अर्ध्या पौंडाहूनही कमी मिळतो. तंबाखू ९ औंस मिळत असे, ती आतां ४ औंस मिळते. तेल पूर्वीं १ गॅलन मिळत असे, तें आतां २/५ गॅलन मिळतें. डुकराचें मांस १ पौंड मिळत असे ते आता १/२ पौंड मिळतें. अर्धा हंड्रेडवेट रबराच्या मोबदला १९३९ सालीं ११ १/२ बुशेल गहूं मिळत असे, त्याऐवजीं आतां ३ १/२ बुशेल मिळतो. म्हणजे, अमेरिकेच्या आयातींत जर रबराची आज किंमत केली तर ती पूर्वीपेक्षा १/४ ते १/२ इतकी घटली आहे असें दिसून येतें.

## विक्रीकर तक्त्यांचें दुरुस्तीनंतरचें स्वरूप

### नवीन सदरांचें स्पष्टीकरण

( लेखकः—श्री. स. वा. दातार, बी. एससी., एलएल. बी. )

मुंबई विक्री-कर-कायद्यांत दुरुस्त्या झाल्यापासून व्यापारी व कारखानदार वर्गावरील जबाबदाऱ्यांत अर्थातच महत्त्वाचे फरक घडून आले आहेत. या दुरुस्त्या झाल्यानंतर एक तिमाही उलटून गेली व त्या तिमाहींतील विक्रीव्यवहाराचे तक्तेहि पाठविले गेले. त्यावेळीं पाठविलेले तक्ते व्यापाऱ्यांना जुन्या साच्यां (फॉर्म्स) वरच पाठवावे लागल्याकारणानें ते भरतांना त्यांतील जुनींनवीं सदरें व खाडा-खोडी कळून घेण्यास बराच त्रास पडला. भरीला दुरुस्तीच्या कायद्याची व त्या खालील नियमांचीं पुस्तकेंहि पुरेशीं उपलब्ध न झाल्याकारणानें फार अडचण झाली. अजूनहि या अडचणी बऱ्याच प्रमाणांत कायम असल्याकारणानें व नवे दुरुस्त साचे तयार झालेले नसल्याकारणानें विक्रीकरास पात्र असलेल्या नोंद-लेल्या व्यापाऱ्यांसाठी दुरुस्त साच्याचा नमुना खाली दिला आहे. सप्टेंबर अखेर पुऱ्या होणाऱ्या तिमाहींतील विक्रीव्यवहाराचे तक्ते ( रिटर्न्स ) भरून पाठवितांना या नमुन्याचा उपयोग होईल अशी अपेक्षा आहे.

दुरुस्तीच्या कायद्याखाली मक्तेदार ( कॉन्ट्रॅक्टर ) वर्गावरील विक्रीकराची जबाबदारी नाहींशी झाल्या कारणानें तक्ता नं. ६ यामधील तत्संबंधीचीं सदरें बाद झालेलीं आहेत. माल चढविण्या-उतरविण्याचा, पोंचविण्याचा किंवा रचण्याचा खर्च याचें सदर आणि, रोखी बाबतच्या वटावाचें सदर, हीं कायम राहिलेलीं असून त्यांच्या भरीला तिमाहींतील परत आलेल्या मालाबद्दल परत दिलेल्या रकमांचें नवें सदर अधिक आलेलें आहे. तिमाहींतील एकंदर विक्रीं-तून वाहतुकीचा, वटावाचा व परतीचा आंकडा वजा घातला म्हणजे व्यवहाराचा ( टर्न ओव्हर ) आंकडा मिळतो; व या आंकड्यांतून कलम ६ ( २ ) ( ब ) मध्यें नमूद केलेल्या रकमा बाद केल्या कीं करपात्र विक्रीचा ( टॅक्सेबल टर्न ओव्हर ) आंकडा मिळतो.

कलम ६ ( २ ) ( अ ) खाली वजा घालावयाच्या रकमां पैकी ( १ ) करमुक्त पदार्थांच्या विक्रीचें, ( २ ) नोंदलेल्या व्यापा-ऱ्यांना केलेल्या विक्रीचें आणि ( ३ ) मुंबईप्रांताबाहेर पाठ-विलेल्या मालाचें हीं सदरें पूर्वीचींच असून त्यांत दुरुस्त नियमावलींतील नियम अथवा कानू ५ ( अ ) खालील करमुक्त विक्रीची भर पडली आहे. या करमुक्त विक्रींत ( १ ) बंकर कोलची विक्री ( २ ) कॉटन क्लॉथ ॲन्ड यार्न कंट्रोल ऑर्डर १९४५ खालील, डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट आणि प्रॉव्हिन्शिल टेक्स-टाईलर कंट्रोल यांच्या हुकुमाखालील कापडादिकांची वगैरे विक्री, यांचा समावेश होतो. करपात्र विक्रीचा आंकडा काढला कीं कलम ६ ( २ ) ( ब ) प्रमाणें यांतून पूर्वीप्रमाणेंच शेंकडा तीन टक्के या प्रमाणांत वजावट करावयाची असून आतां नव्या दुरुस्त्यामुळें त्यांत कांहीं रकमांची भरहि घालावी लागणार आहे.

कलम १८ व १८ अ यांचेखाली नोंदलेल्या व्यापाऱ्यांनीं ( १ ) आपली सर्व दुकानदारी अथवा ( २ ) आपल्या दुकान-दारीचा कांहीं भाग दुसऱ्या कोणास विकला आणि तो खरेदीदार जर नोंदलेला व्यापारी नसला तर विक्रीच्या वेळीं दुकानांत शिल्लक असलेल्या मालसांठ्यावर त्याला विक्री—कर द्यावा लागणार आहे. त्याचप्रमाणें एखाद्या नोंदलेल्या व्यापाऱ्याची विक्री सतत तीन वर्षे करपात्र मर्यादेखाली झाल्यामुळें अथवा दुकान बंद केल्यामुळें अथवा विकून टाकल्यामुळें जर त्याची नोंदणी रद्द झाली असेल तर ती रद्द होण्याचे वेळीं त्याचेजवळ विक्री न झालेला जो माल-सांठा असेल, त्यावर त्याला विक्रीकर द्यावा लागणार आहे. या दोन कारणांनीं जवळ शिल्लक उरलेला माल-सांठा नव्या तक्त्यांत नमूद करावा लागणार आहे.

त्याशिवाय नोंदलेल्या व्यापाऱ्यांना आतां कोठलाहि माल करमुक्त खरेदी करण्याची सवलत देण्यांत आलेली आहे. खासगी-वापराकरितां सुद्धां आतां नोंदलेल्या व्यापाऱ्यांना करमुक्त खरेदी करतां येणार आहे. त्यासाठी नोंदणीच्या दाखल्यांत नमूद नसलेल्या कारणाव्यतिरिक्त इतर कारणासाठी नोंदलेल्या व्यापाऱ्यांनीं जो माल खरेदी केलेला असेल त्याचीहि नोंद तक्त्यांत समाविष्ट करण्यांत आलेली आहे. ह्या सर्व फरकांचा परिणाम म्हणून आतां, तक्ता नं. ६, 'तिमाहींतील विक्रीवरील कराचें पत्रक' यांतील मुख्य सदरें खालील स्वरूपाचीं झालेलीं आहेत.

रुपये

१ तिमाहींतील एकूण ठोक विक्री

वजा

२ ( १ ) तिमाहींत केलेल्या विक्र्यां-वरील माल चढविण्याचा, पोंचविण्याचा किंवा रचण्याचा खर्च जेव्हां खरेदीदारा-वर निराळा आकारला असेल तेव्हांची त्याची रक्कम

( २ ) तिमाहींतील रोख वटाव जेव्हां स्वतंत्रपणें दाखविला असेल तेव्हांची त्याची रक्कम

( ३ ) तिमाहींत परत आलेल्या मालाची किंमत

व्यवहार

वजा

३ तिमाहींतील विक्री व्यवहारांतून कलम ६ ( २ ) ( ब ) अन्वयें बाद करा-वयाच्या रकमा.

( १ ) कलम ७ अन्वयें माफी मिळालेल्या करमुक्त मालाची विक्री

( २ ) नोंदलेल्या व्यापाऱ्यांना केलेली विक्री

( ३ ) मुंबई प्रांताबाहेर पाठविलेला माल.

( ४ ) कानू ५ अ अन्वयें माफी असलेल्या मालाची विक्री

शिल्लक ( अ )

वजा

४ कलम ६ ( २ ) ( ब ) अन्वयें बाद करावयाची ( अ ) शिलकीच्या शेंकडा तीन टक्के या प्रमाणांतील रक्कम

अधिक

५ ( १ ) नोंदणीदाखल्यांत निर्दिष्ट केलेल्या कारणांखेरीज इतर कारणांसाठी घेतलेला माल

. (२) कलम १८ व १८ (अ)
खालील माल-सांठ्याची किंमत

जीवर कर भरावा लागेल अशी रकम

दुरुस्तीच्या कायद्यामुळें मुख्य सदरें वरील स्वरूपाची झालेली असून बाकीचा साठा ( फार्म ) पूर्वीप्रमाणेंच रहाणार आहे.

**एक फायद्याचें कलम**

विक्रीकराचें पत्रक भरण्यासाठीं वरीलप्रमाणें साठ्यांतील सदरें भरून करपात्र विक्रीचा व त्यावरून विक्री कराचा आंकडा काढला कीं तो व्यापाऱ्यांनीं आपल्या गिऱ्हाइकांकडून वसूल केलेल्या विक्रीकराच्या रकमेपेक्षां थोडा कमी आलेला आढळून येतो. अशा वेळीं कित्येक व्यापारी घाबरून गेलेले आढळून आलेले असून त्यांनीं वसूल केलेली सर्व रकम, सुरक्षिततेचा मार्ग म्हणून सरकारांत भरून टाकलेली आहे. सरकारी अधिकाऱ्यांनीं हिशेब पाहिले आणि आपल्या खात्यांवर विक्रीकराची वसुली अधिक, व आपण भरलेली कराची रकम कमी, असें त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आलें तर नसती पंचाईत होईल, असें भय त्यांना वाटतें! परंतु ही भीति सर्वस्वी अनाठायी आहे. कराच्या वसुलींत व भरण्यांत येणाऱ्या रकमेंत फरक हा अगदीं साहजिक व न्याय्य आहे. कलम ६ (२) (ब) अन्वयें मिळालेल्या ३ टक्के सुटीचा तो परिणाम असून, कर वसूल करून तो सरकारांत भरण्याच्या यातायातीबद्दल सरकारनें व्यापाऱ्यांना दिलेली ही एक सवलत असल्याकारणानें भरण्यापेक्षां अधिक झालेली वसुली स्वतःला घेण्यास व्यापाऱ्यांना कांहींहि प्रत्यवाय नाहीं!

**दि मिरज स्टेट बँक लि., मिरज**

१० हजारांच्या वसूल भांडवलावर वरील बँकेस ३०-६-४७ अखेर संपलेल्या वर्षी ९१,९५५ रु. नफा झाला. १४% +६% बोनस = २०% डिव्हिडंडला ४,००० रु. लागतील. २०½ हजार रुपये जनरल रिझर्व्ह फंडांत गेल्यावर तो फंड २,४०,३०० रुपये होईल. इतर फंड १,०६,०६४ रुपयांचे आहेत. गेल्या वर्षीच्या नफ्यांतून १२ हजार रुपये इमारत फंडासाठी काढण्यांत येतील. बँकेची स्वतःची इमारत १५½ हजारांची आहे. तिची किंमत सालोसाल घसारा काढून कमी कमी दाखविण्यांत येत आहेच. इन्कमटॅक्स व सुपरटॅक्स ह्यांसाठी ५५ हजारांची तरतूद केली आहे. बँकेकडे एकूण ठेवी ७१½ लक्ष रुपयांच्या आहेत. बँकेनें १६½ लक्ष रु. रोख व ४७ लक्ष रुपये सरकारी रोख्यांत ठेवले आहेत. ह्या सर्व आंकड्यांवरून बँकेची सुस्थिति व किफायतशीरपणा हीं दिसून येतील. रा.रा. विष्णु पांडुरंग बेडेकर, बी. एससी., बी. ई. हे चेअरमन असून श्री. कृष्णाजी धोंडो शिराळकर, बी. ए. हे मॅनेजर आहेत.

**कस्टम्स युनिअनला न्यूझीलंडचा विरोध**—ब्रिटिश साम्राज्यांतील राष्ट्रांनीं जकातीसंबंधी एकसूत्री धोरण स्वीकारून आपला गट स्थापावा अशी सूचना ब्रिटनचे परराष्ट्रमंत्री मि. अर्नेस्ट बेव्हिन ह्यांनीं केली होती. सदर सूचना न्यूझीलंडचे लोक आणि सरकार ह्या दोघांनाही पसंत नसल्याचें न्यूझीलंडच्या पंतप्रधानांनीं प्रकट केलें आहे. अशा प्रकारच्या गटाच्या स्थापनेमुळें न्यूझीलंडच्या औद्योगिक प्रगतीला धोका येईल असेंहि मत त्यांनीं प्रदर्शित केलें आहे.

**भूकबळींचा पुन्हा अवतार**—चितगांवच्या आसपास पुरामुळें बरेच लोक निराश्रित झाले होते. पुरामुळें झालेल्या पिकांच्या नुकसानीनें उपास पडून बरेच लोक मेल्याचें वृत्त आहे.

## विविध माहिती

**हिंदी कलावंतांचें स्फूर्तिस्थान**—एका बंगाली चित्रकाराच्या चित्रांचें प्रदर्शन नुकतेंच मुंबई येथें भरविण्यांत आलें होतें. सदर प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगीं मुंबईचे मेयर मि. सबावाला ह्यांनीं असे उद्गार काढले कीं, हिंदी चित्रकारांनीं परंपरागत संन्यस्त वृत्ति सोडून देऊन गतेतिहासांतील व पुराणांतील दंतकथा अगर पुराणकथा ह्यांच्या ऐवजीं सध्याच्या लोकजीवनाकडे त्यांनीं स्फूर्तीसाठी वळलें पाहिजे.

**परदेशीं पैसे पाठविण्यासंबंधीं**—पौंड स्टर्लिंगच्या कक्षेंत येणाऱ्या देशांकडे मनिऑर्डरी पाठविण्याचें हिंदुस्थान-सरकारच्या पोस्ट खात्यानें तूर्त बंद केलें आहे. डॉलरप्रमाणेंच पौंड ही सुद्धां महत्त्वाची परराष्ट्रीय हुंडणावळ असल्यामुळें तिचा खर्च अगदीं जरूर तेव्हांच करण्याचें सरकारचें धोरण प्रसिद्धच आहे. गेल्या जुलैच्या प्रारंभीं, पौंडी भांडवल हिंदुस्थानाबाहेर जाऊं नये म्हणून एक्सचेंज बँकांना सरकारनें तशा प्रकारच्या सूचना दिल्या होत्या. परंतु पोस्टातर्फे परदेशीं जाणाऱ्या पौंडांचे व्यवहार चालूच होते. ह्या व्यवहारावरही आतां हंगामी बंदी घालण्यांत आली आहे.

**इंग्लिश खाडीखालून बोगदा**—इंग्लिश खाडीच्या खालून बोगदा खणून तो फ्रान्सला जोडण्यांत यावा अशी कल्पना निघून ८० वर्षे झालीं. आज ही कल्पना प्रत्यक्ष अंमलांत आणण्याच्या दृष्टीनें सर्वांत अधिक अनुकूल परिस्थिति आहे, असे उद्गार सर हर्बर्ट वॉकर ह्यांनीं काढले. सर वॉकर हे चॅनेल टनेल कंपनी लि. चे अध्यक्ष आहेत.

**अमेरिकेंत घोड्यांना अजूनहि गहू चारतात**—अमेरिकेचे माजी अध्यक्ष मि. हूवर ह्यांनीं, अमेरिकन लोकांनीं आपण होऊन शिधा-वाटप पत्करावी अशी सूचना केली आहे. जगांतील कित्येक देशांत लोक अन्नान्नदशेला पोंचले असतां अमेरिकन शेतकऱ्यांनीं घोड्यांना गहू चारण्याचा मोह आवरून धरला पाहिजे, असा उपदेशही त्यांनीं केला आहे.

**इंडियन लिसनरचा अंक निघाला नाहीं**—ऑल इंडिया रेडिओचे कार्यक्रम देणारीं इंडियन लिसनर, आवाज व सारंग हीं तीन पाक्षिकें छपाईच्या अडचणींमुळें १६ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर ह्या मुदतीचे कार्यक्रम देऊं शकलीं नाहींत.

**सरकारी निर्णयाला न जुमानण्याचा परिणाम**—औद्योगिक कलहांच्या बाबतींत सरकारनें दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी न करण्याबद्दल संयुक्तप्रांत सरकारनें अलाहाबादेंतील ७ बँका आणि कानपूरमधील ९ बँका ह्यांच्या विरुद्ध खटले भरले असल्याचें समजतें.

**म्हैसूर ग्लास अँड एनामल वर्क्स लि.**—म्हैसूरमधील रेल्वे संपामुळें मुंबईकडील टपालास उशीर होत असल्या कारणानें, ह्या कंपनीनें नव्या शेअर्सचे अर्जाची तारीख १० ऑक्टोबरपर्यंत वाढविली आहे.

**पाकिस्तानचा ब्रिटिश आर्थिक सल्लागार**—बँक ऑफ इंग्लंडचे सल्लागार मि. जॉन टर्नर हे पाकिस्तान सरकारला आर्थिक सल्ला देण्यासाठी कराचीला आले आहेत. त्यांचा मुक्काम कराचीला ६ आठवडे राहाणार आहे.

**ब्रिटिश वार्तापटाला बंदी**—मुंबई सरकारनें इंग्लंडच्या बादशहांच्या दक्षिण आफ्रिकेंतील दौऱ्याचा वार्तापट दाखविण्यास बंदी केली आहे. दक्षिण आफ्रिकेंतील वंशविद्वेषी कायद्याची ही प्रतिक्रिया आहे असें समजतें.

## कॉमनवेल्थ विमा कंपनीचें पांचवें मूल्यमापन

श्री. एस. एम. जोशी ह्यांची अभिनंदनीय कामगिरी

ता. २१ सप्टेंबर १९४७ रोजीं वरील कंपनीच्या भागीदारांची १८ वी वार्षिक साधारण व विशेष साधारण सभा भरून वार्षिक अहवाल व मूल्यमापनाचा अहवाल मंजूर करण्यांत आले. ह्या प्रसंगीं कंपनीचे अध्यक्ष श्री. ल. ब. भोपटकर ह्यांनीं केलेल्या भाषणांत आयुर्विमाव्यवसायाच्या धंद्यासंबंधीं विमा कंपन्यांच्या अडचणी, इतर कंपन्यांच्या अध्यक्षीय भाषणांप्रमाणेंच, पुढें मांडण्यांत आलेल्या आहेत. १९३८ चा विमा कायदा व त्यांत वेळोवेळीं करण्यांत आलेल्या दुरुस्त्या ह्यांच्या कचाट्यांतून विमा कंपन्यांचा कारभार चालविणें म्हणजे तारेवरची कसरत करण्यासारखेंच अवघड झालेलें आहे. व्याजाचे घसरत चाललेले दर, विमा कंपन्यांवरील खर्चाची वाढती जबाबदारी आणि प्राप्तीवरील कराची जबरदस्त आकारणी ह्या तीन संकटांमुळें मोठमोठ्या विमा कंपन्यांनाही आपले बोनसचे दर कमी करावे लागले आहेत. त्यांतून कॉमनवेल्थ विमा कंपनीवर १९४० सालीं आलेलें गंडांतर लक्षांत घेतलें तर ही कंपनी ५ वर्षांच्या अवधींत आपलें बस्तान पुन्हा बसवूं शकेल असें फार थोड्या लोकांना वाटत होतें. परंतु समाधानाची गोष्ट अशी कीं कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. एस. एम. जोशी ह्यांनीं संचालक मंडळाच्या सल्ल्यानें व मदतीनें ही अशक्य वाटणारी गोष्ट आज मूर्त स्वरूपांत आणली आहे.

कॉमनवेल्थ विमा कंपनीच्या मूल्यमापनाच्या फलश्रुतिबद्दल 'अर्थां'त नुकतेंच लिहिलें आहे. तथापि मूल्यमापनाच्या व विमा व्यवसायाच्या परस्पर संबंधाबद्दल कांहीं तात्त्विक विचार व्यक्त करणें आम्हांस जरूर वाटतें. सामान्य विमेदाराला, एजंटाला, भागीदाराला अगर विमा-संबंधित जनतेला मूल्यमापनाला आधारभूत धरलेला पाया म्हणजे एक गौडबंगाल वाटत असतें. उदाहरणार्थ, कॉमनवेल्थ कंपनीच्या बाबतींतच कंपनीच्या अध्यक्षांनीं असें म्हटलें आहे कीं, व्याजाचा दर ३½ टक्के धरला असता तर रु. ३,१०,००० इतका नफा उरला असता. पण ३ टक्के धरल्यामुळें तो रु. ३७,४२९-७-१० येवढाच उरला. आतां प्रश्न असा उत्पन्न होतो कीं व्याजाचा दर ३½ टक्के धरून विमेदारांना बोनस आणि भागीदारांना नफा कां देण्यांत आला नाहीं? ह्या प्रश्नाचें उत्तर विमा व्यवसायाचें विशिष्ट स्वरूप लक्षांत घेतल्याखेरीज मिळणार नाहीं. आयुर्विमा व्यवसायांत सर्वांत अधिक हितसंबंध विमेदारांचे गुंतलेले असतात. आपद्‌कालाची तरतूद करण्यासाठींच विमे उतरले जात असल्यामुळें विमानिधीची भरभक्कम उभारणी आणि शाश्वति एवढ्याच मुद्यांना प्राधान्य देण्यास हवें.

सामान्य व्यवहारांत अंथरूण पाहून पाय पसरावे अशी म्हण नेहमीं वापरण्यांत येते. ह्याच लौकिक शहाणपणाचा अवलंब करून विमा कंपन्यांच्या मूल्य मापनांत खऱ्या वस्तुस्थितीपेक्षां थोडी अधिक प्रतिकूल परिस्थिति गृहीत धरूनच चालावें लागतें. व्याजाचा दर अधिक धरून पुढें तो कमी पडल्यास पस्तावण्यापेक्षां वेळींच थोडीशी 'फाजील' सावधानता दाखविणें व्यवहारचातुर्याच्या दृष्टीनें व परिणामाच्या दृष्टीनें सुफलदायी ठरतें. ह्या दृष्टीनें विचार करतां कॉमनवेल्थच्या मूल्यमापनांत डोळे दिपविण्यासारखी प्रगति दिसत नसली तरी पुढील मूल्यमापनांत तशी कामगिरी करण्यासाठीं पायाभरणी खचित केलेली आहे. कंपनीनें जाहीर केलेला इंटेरिम बोनस, व्याजाचा दर २¾ टक्क्या इतका खालीं येण्याचा संभव लक्षांत घेऊन ठरविण्यांत आला आहे. त्याचप्रमाणें हप्त्याच्या उत्पन्नाचा खर्चासाठीं व बोनससाठीं राखून ठेवलेला भागही समाधानकारक आहे.

### दि सारस्वत को. बँक लि., मुंबई

वरील बँकेची वार्षिक सभा ता. २७ रोजीं झाली, त्यावेळीं ३७,०९४ रु. निवळ नफ्यांतून ५% + १½% बोनस = ६½% डिव्हिडंड वाटण्यासाठीं २४ हजार रुपयांचा विनियोग करण्याचें ठरलें व १० हजार रु. रिझर्व्ह फंडांत टाकण्यांत आले. बँकेचें वसूल भांडवल ३,९७,५७० रु. असून तिच्या रिझर्व्ह व इतर फंडांत सुमारे २½ लक्ष रुपये आहेत. बँकेचे एकूण खेळतें भांडवल गेल्या वर्षांत ७१ लक्ष रुपयांचें ७९ लक्ष रुपये झालें. १९४५ सालीं तें ५३ लक्ष रुपये होतें. बँकेनें गेल्या वर्षी ३,११,७८० रुपयांचीं १४६ कर्जें दिलीं आणि ५५ सभासदांना १५,१०,२५० रुपयांचा ओव्हरड्राफ्ट मंजूर केला. वर्ष अखेर १५,८६,५०९ रुपयांचीं कर्जें येणें होतीं. बँक धारण करीत असलेल्या सरकारी रोख्यांची बाजारभावानें होणारी किंमत (५६,२५,७४४६.) हिशेबांत दिसणाऱ्या किंमतीपेक्षां २,२३,२८८ रुपयांनीं जास्त आहे. बँकेच्या इमारतीच्या जमाखर्चाचा स्वतंत्र हिशेब ठेवून, त्यांतील ६,२४७ रुपयांचा सर्वच्या सर्व वाढावा इमारत फंडाकडे वर्ग करण्यांत आला. बँकेच्या धान्याचे दुकानांत ८६० कार्डें नोंदलेलीं असून त्याचे व्यवहारांत झालेला १,३८८ रुपयांचा नफा पुढील वर्षांत ओढण्यांत आला आहे. सारस्वत को. बँक ही इतर बँकांना आदर्शवत् वाटते आणि तिच्या चालकांचें बँकेची मजबुती वाढविण्याचें आणि सभासदांच्या हितसंवर्धनाचें धोरण सर्वत्र अनुकरणीय आहे. श्री. वा. पुं. वर्दे ह्यांच्या नेतृत्वाखालीं बँकेची उत्कृष्ट प्रगति झाली आहे आणि तिच्या व्यवस्थापकाचें काम श्री. एस. व्ही. संझगिरी दक्षतेनें करीत आहेत.

### दि इचलकरंजी सं. को. बँक लि.

मागील वर्षाचे अखेरीस शेअर भांडवल ३९,४७५ रु. होतें तें ह्यावर्षी ४३,३२५ रु. झालें, एकूण फंडाची रकम ४९,०५४ रु. ची ५९,५६३ रु. झाली व अशा रीतीनें बँकेचें स्वतःचें भांडवल ८८,८५७ रुपयांचें १,०३,३६३ रु. झालें. खेळतें भांडवल ११,१०,९४२ रु. चें ११,२४,१२६ रु. वर गेलें. थकबाकीचें प्रमाण फक्त २·५% आहे. बँकेच्या आजरे येथील शाखेचा व्यवहार समाधानकारक चालू आहे. अहवालाचे वर्षी बँकेस २१,७८४ रु. नफा झाला. इतका नफा बँकेस आतांपर्यंत कोणत्याहि वर्षी झाला नव्हता. भागीदारांस ७½% डिव्हिडंडला ३,०८५ रु. लागतील व १६ ¾ हजार रुपये वेगवेगळ्या फंडांत टाकले जातील. श्री. नरसगोंडा आण्णा पाटील हे डायरेक्टर बोर्डाचे चेअरमन असून श्री. दौलतराव काळे हे मॅनेजर आहेत.

### अर्बन को. बँक लि., सांगली

वरील बँकेचें वसूल भांडवल १,००,७३०, रुपये झालें असून ठेवींत १,२२,४६५ रु. ची वाढ होऊन त्यांची रकम १२¾ लक्ष रुपयांवर गेली, थक बाकीचें प्रमाण ३·९% वरून २·९% वर आलें आहे. एकूण निवळ नफा १२, ९५२ रु. झाला. ६½% डिव्हिडंडला ६,३०० रु. लागले. श्री. ग. कों. गोडबोले, बी. ए., एल. एल. बी., हे बँकेचे चेअरमन असून श्री. ल. य. लागू, बी. ए., एलएल. बी. हे व्यवस्थापक आहेत.

### नवयुग चित्रपट लि., पुणें

३० एप्रिल, १९४७ अखेर संपलेल्या वर्षी वरील कंपनीस ४,५३२ रु. निवळ नफा झाला त्याचा विनियोग जुना तोटा कमी करण्याकडे केला जाईल. कंपनीनें सप्टेंबरच्या अखेरीस नव्या बोलपटाचा मुहूर्त केला. मॅनेजिंग एजन्सीचे एक भागीदार, श्री. हरीभाऊ जोशी, ह्यांस डायरेक्टर-इन-चार्ज नेमून त्यांच्या नेतृत्वाखालीं काम चालू आहे.

आरको
प्रत्येकास लागणारी नित्योपयोगी वस्तु
आरको निलगिरी तेल
लक्ष्मी एजन्सी, मुंबई २४

तयार कपड्यांचे व्यापारी
महिंद्रकर ब्रदर्स
गिरगांव, मुंबई नं. ४
व बुधवार चौक, पुणें

श्री — श्री — श्री — श्री — श्री

श्री

# दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

युद्धोत्तरकालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण
वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के
डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री — श्री — श्री — श्री — श्री

## मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून ) + व्याज वजा

सात्ताहिक बंद भाव


| १९४६ मधील चढउतार | दिलेलें व्याज † संडिन S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार २३।९।४७ | बुधवार २४।९।४७ | गुरुवार २५।९।४७ | शुक्रवार २६।९।४७ | सोमवार २९।९।४७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६९७-८; २५२७-८ | १००-१३-४ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड | ३० | १६०२—८ | १६४५ | १६३५ | १६२० | १६७० |
| ६३८; ४५७-८ | १९-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ३२९—८ | ३३७ | ३३५ | ३३३ | ३४२-८ |
| ६५; ३६-४ | ०-८-०S | ऑगस्ट | बेंगॉल स्टील | १० | २४-१२ | २५—४ | २५-१२ | २५-२ | २५—२ |
| ७१-४; ४४-१० | ०-१४-०S | डिसेंबर | इंडियन आयर्न | १० | ३१—८ | ३१-१५ | ३२—२ | ३२ | ३२—४ |
| ३२७७-८; २१३२-८ | १२-८-०† | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | १०२५—० | १०७० | १०६० | १०५२-८ | १०७०+ |
| ११८०; ६५८ | ६-०-०† | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ५४०—० | ५५४ | ५४८ | ५४६ | ५६२ |
| ९९९; ६६० | २७-०-० | मे | स्वदेशी | १०० | ५७३—० | ५९४ | ५८९ | ५८५ | ५९५ |
| ९६७; ३९८ | २-०-०† | नोव्हें.-एप्रिल | नागपुर | १०० | २८३—० | २९६ | २९४ | २९१ | २९० |
| ५५२; ३१४ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | २९०—० | २९७ | २९५ | २९४ | ३०७-८ |
| ५७१; ३२३ | १२-०-०S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | ३१८—० | ३३१ | ३३२ | ३३३ | ३३९ |
| ५९४; ३२५-८ | ४-०-०† | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | २२५—० | २३७ | २३९ | २३८ | २४३ |
| ७-४-६; ४-८-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ३-१५ | ४-० | ३-१५-६ | ३-१५ | ४—२ |
| २९-१; १६-१२ | ०-१३-९ | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १४-१४ | १५-६ | १५-५ | १५—३ | १५-९-६ |
| ६-११-६; ३-३-६ | ०-२-६ | मे | ,, डिफर्डस् | १ | २-१२ | २-१३-६ | २-१२-६ | २-१२ | २—१५ |
| १०९२-८; ७३५ | २१-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ५४८-१२ | ५६० | ५५२-८ | ५५० | ५७१-४ |
| २७८; २२५ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | १५९—८ | १६० | १५९-८ | १५९—८ | १६२-४ |
| ३७५; २४० | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | १५७—० | २६२ | २६२ | २६९ | २७० |
| ९१०; ६०५ | १०-०-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ४६६—४ | ४७२-८ | ४६७-८ | ४६६-४ | ४७३-१२ |
| ६०-१० ३६-१२ | १-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ३०—४ | ३०—८ | ३०-११ | ३०—११ | ३१—२ |


-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
—खादीचें माहेरघर—

# खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ,
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २

## पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २२७३८


### 'अर्थ' ग्रन्थमाला.


१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार






## साठे बिस्किटें

ठराविक पुरवठा नियमितपणें दरमहा होत आहे. आतां माल सांचवून ठेवूं नका.

प्रचलित सरकारी नियंत्रणामुळें बिस्किटांकरतां लागणारा योग्य तो कच्चा माल मिळणें अशक्य झालें आहे. तथापि त्यांतल्या त्यांत चांगला माल मिळेल तोच वापरण्याचा आमचा सतत प्रयत्न असतोच. तरी व्यापाऱ्यांनीं बिस्किटें जास्त दिवस सांचवून न ठेवतां शक्य तितका ताजा माल ग्राहकांस देण्याची खबरदारी घेणें अधिक चांगलें।

साठे बिस्किट कंपनी, पुणें २.

# दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०

हेड ऑफिसः—पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर रोड, ओझर (जि. नाशिक), खोपोली पे ऑफिसः

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | ... | रु. ७,९३,८१० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. ३,९६,१४५ |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ५५ लाखांवर |

चेअरमनः—श्री. के. चि. केळकर, M. A., LL. B. (वकील)

० गतवर्षी ऑर्डिनरी शेअर्सवर चार टक्के अधिक अर्धा टक्का कर-माफ डिव्हिडंड दिलें.

० मुंबई, नगर, नाशिक, बंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे ठिकाणीं डिमांड ड्राफ्टस् दिले जातात.

० बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

एन. एन. क्षीरसागर,
आर. बी. साळवेकर,
बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग डायरेक्टर्स.






# दि बँक ऑफ इंडिया, लि.

स्थापना १९०६

| | |
|---|---|
| खपलेलें भांडवल :- | ३,००,००,०००. |
| वसूल झालेलें भांडवल :- | १,५०,००,०००. |
| राखीव फंड :- | २,००,००,०००. |

मुख्य कचेरीः-ओरिएंटल बिल्डिंग्ज, मुंबई.

इतर शाखा :- मुंबईः- बुलियन एक्स्चेंज, कुलाबा, काळबा देवी व मलबार हिल. मुंबई नजीकः-वांद्रें व अंधेरी. अहमदाबादः-भद्र (मुख्य शाखा) इलिस ब्रिज, माणिक चौक व स्टेशन शाखा. कलकत्ता :-क्लाइव्ह स्ट्रीट (मुख्य शाखा), बडा बाजार व चौरंघी स्क्वेअर. नागपूरः-किंग्जवे व इतवारी बाजार. पुणेंः-लष्कर व शहर. मद्रास, कोईमतूर, कालिकत, अमृतसर, भुज (कच्छ), हैद्राबाद (सिंध), जमशेटपूर, जुनागड, कराची, पालनपूर, राजकोट, सुरत, सोलापूर, वेरावल.

लंडन शाखा :- १७ मूरगेट, लंडन ई. सी. २.


न्यूयॉर्क एजंट्स :-दि चेस नॅशनल बँक ऑफ दि सिटी ऑफ न्यूयॉर्क.

डायरेक्टर्स :-सर कासवजी जहांगीर, बॅरोनेट, जी. बी. इ, के. सी. आय. इ. चेअरमन; श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाइट, मि. ए. गेडिस, मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण, ना. सर शांतिदास अस्करन, नाइट, मि. महंमद सुलेमान कासम मिठा, सर किकाभाई प्रेमचंद, नाइट, श्री. भगवानदास सी. मेहता.

चालू ठेवींचें खातें:—कांहीं ठिकाणें सोडून रोजच्या रु. ३०० ते रु १ लक्ष पर्यंतच्या शिलकेवर दरसाल द. शे. एकचतुर्थांश रु. व्याज देण्यांत येतें. रु. १ लाखाहून जास्त शिलकेवर खास योजनेनें व्याज दिलें जातें. सहामाही व्याज रु. ५ पेक्षा कमी झाल्यास तें दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग्ज बँक ठेवी योग्य अटीवर स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें. विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

बी. एन्. अटल, एजंट, पुणें.



आमचे प्रमुख जाहिरात प्रतिनिधी

★ दत्तात्रय रामचंद्र कुलकर्णी ★

९६ नारायण पेठ, पुणें २.








हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.